निशाणी ४८ वरील आदेश
विशेष दिवाणी दावा क्र.२१६/२०१२

प्रतिवादी क्र. २ दिनांक १४.३.२०१७ रोजी मयत झाल्याची पुरसिस निशाणी क्रमांक ४७ येथे दाखल झाल्याने त्यांचे वारस प्रतिवादी क्र.१, ३ व ४ हे असल्याने नव्याने वारस अभिलेखावर घेण्याची गरज नाही. परंतु दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.२ मयत असल्याची दुरुस्ती आवश्यक असल्याने तशी दुरुस्ती करण्यास या अर्जाने वादीने परवानगी मागितली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जावर म्हणणे देवुन आक्षेप नोंदवला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. निशाणी क्र.४७ येथे प्रतिवादी क्र.२ दिनांक १४.३.२०१७ रोजी मयत झाले असल्याचे प्रतिवादी क्र. १ यांनी कळवले आहे. त्यास अनुसरुन वादीने हा अर्ज केला आहे. वादीचे म्हणणे प्रमाणे मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस हे प्रतिवादी क्र.१,३ व ४ आहेत. त्यामुळे नवीन वारस अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. सबब, प्रतिवादी क्र.२ चे नावा समोर दाव्याचे सरनाम्यात मयत असा उल्लेख करुन प्रतिवादी क्र.१,३ व ४ तिचे वारस असल्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. सबब मी खालील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी ४८ मंजुर केला आहे.

२. अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.२ मयत असल्याचा उल्लेख करुन प्रतिवादी क्र.१,३ व ४ सदर मयताचे वारस असल्याचा उल्लेख करण्यास परवानगी दिली आहे.

३. उपरोक्त आदेशाप्रमाणे दुरुस्ती करुन वादीने दुरुस्ती वादपत्र मुदतीत दाखल करावे.

४. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालात अंतर्भुत करावा.

स्वाक्षरीत/—

(रा.अ.सासने)

दिनांक २३.०८.२०१८

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Kondekar B.R. |
| Court | : | Civil Court S.D. Pandharpur |
| Date | : | 23/08/2018 |

Judgment/order signed by
the Presiding Officer on : 23/08/2018

Judgment/Order uploaded on: 23/08/2018